॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

मेहनत केली की नशीबही साथ देतं;
मेहनतीवर विश्वास ठेव, नशिबावर नाही.

अहिल्यानगर | मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ११० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### भूमिका

सत्तेत व विरोधात
बदलत गेल्या भूमिका
सत्तेत असते समर्थन
विरोधात वाटतात चुका

विकासाच्या आड येते
राजकारणाची खोड
अन्याय अन पक्षनिष्ठा
गोड शब्दांची जोड

## SPOT NEWS

### कर्जमाफीच्या चौथ्या यादीत ४ लाख १५ हजार शेतकरी

**● मुंबई –** राज्यात दुष्काळाचे भीषण सावट असताना हवालदिल झालेल्या बळीराजासाठी राज्य सरकारने ऐन दिवाळीच्या तोंडावर अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पात्र शेतकरी लाभार्थ्यांची बहुप्रतिक्षित चौथी यादी प्रसिद्ध केली आहे. कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा ताळेबंद मांडताना सहकार विभागाकडून सविस्तर आकडेवारी समोर आली आहे. राज्य शासनाने आतापर्यंत पात्र ठरलेल्या एकूण २५ लाख शेतकऱ्यांपैकी १५ लाख ८५ हजार ४९३ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ दिला आहे. यासाठी शासनाने आतापर्यंत थेट तब्बल १३,२७५ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर वितरीत केले आहेत. यापूर्वी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या तिसऱ्या यादीमध्ये राज्यातील ३ लाख ५१ हजार १९२ शेतकऱ्यांचा समावेश होता. त्यानंतर तातडीने प्रशासनाने हालचाली करत ४ लाख १५ हजार शेतकऱ्यांची चौथी यादी प्रसिद्ध केली आहे. दुष्काळाचा सर्वाधिक फटका बसलेल्या मराठवाड्यातील तब्बल ६ लाख २७ हजार शेतकऱ्यांना आतापर्यंत या योजनेचा थेट लाभ मिळाला असून, शेतकरी आत्महत्याग्रस्त भागाला यामुळे मोठा आधार मिळाला आहे.

### मुख्यमंत्र्यांना सह्याद्रीचे वाळवंट करायचंय का? : सयाजी शिंदे

**● मुंबई –** रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आणि भीमाशंकर अभयारण्य परिसरात 'टोरंट पॉवर' कंपनीच्या प्रकल्पासाठी होत असलेल्या वृक्षतोडीवरून राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. राजकीय नेत्यांनंतर आता पर्यावरणप्रेमी आणि अभिनेत्यांनी या जंगलतोडीविरोधात तीव्र रोष व्यक्त केला आहे. सह्याद्रीच्या जंगलाचे महत्त्व सांगताना सयाजी शिंदे म्हणाले, भारतातील एकूण जंगल जमिनीपैकी ५ टक्के जंगल आपल्या सह्याद्रीत आहे. याच डोंगरांमुळे आणि झाडांमुळे पाऊस पडतो, इथूनच उगम पावणाऱ्या नद्यांवर संपूर्ण महाराष्ट्र जगत आहे. मात्र, आता याच सह्याद्रीवर नवनवे प्रकल्प आणले जात आहेत. टोरेंटचा प्रकल्प हा त्यातीलच एक असून, त्यासाठी ६०० एकर जमीन देऊन तिथली झाडे राजरोसपणे तोडली जात आहेत. या प्रकल्पातून मिळणाऱ्या फायद्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करत त्यांनी सरकारला धारेवर धरले.

# संगमनेरमध्ये १५ लाखांचा अन्नसाठा जप्त

## अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई । ९,५९६ किलो धने डाळ व बडीशेप ताब्यात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम तीव्र केली आहे. 'फेस्टिव्हल ड्राईव्ह २०२६' अंतर्गत प्रशासनाच्या पथकाने २४ ऑक्टोबर २०२६ रोजी संगमनेर येथील एका अन्न प्रक्रिया उद्योगावर छापा टाकून सुमारे १५ लाख ५६६ रुपये किमतीचा संशयित व चुकीचे लेबल असलेला अन्नसाठा जप्त केला. या कारवाईत एकूण ९ हजार ५९६ किलो धने डाळ आणि बडीशेपचा साठा ताब्यात घेण्यात आला.



राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, नाशिक विभागाचे संयुक्त आयुक्त श्री. माने आणि अन्न विभागाचे सहायक आयुक्त एस. एच. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

संगमनेर तालुक्यातील मेसर्स जगदंबा फूड प्रॉडक्ट्स या प्रतिष्ठानावर अन्न सुरक्षा पथकाने तपासणी केली. यावेळी संशयास्पद अन्नसाठा आढळून आल्याने तो जप्त करण्यात आला.

कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेल्या साठ्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. यामध्ये धने डाळ : ५,९९८ किलो साठा, किंमत ८ लाख ९९ हजार ७०० रुपये. हा साठा गुजरातमधील उंझा येथील डी. ए. पटेल या पुरवठादाराकडून मागविण्यात आला होता. बडीशेप : ३,५९८ किलो साठा, किंमत ६ लाख ८६६ रुपये. हा साठाही उंझा येथील डी. ए. पटेल यांच्याकडून आणण्यात आला होता.

या दोन्ही पदार्थांचा एकूण ९ हजार ५९६ किलो साठा जप्त करण्यात आला असून, त्याची किंमत १५ लाख ५६६ रुपये आहे.

जप्त करण्यात आलेला अन्नसाठा चुकीचे लेबल असलेला (मिसब्रँडेड), निकृष्ट दर्जाचा (सबस्टँडर्ड) किंवा आरोग्यास अपायकारक (अनसेफ) असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी संबंधित पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत.

प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्षांच्या आधारे अन्न सुरक्षा कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबतचा अंतिम निष्कर्ष प्रयोगशाळेच्या अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे.

ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी यू. आर. सूर्यवंशी आणि सहायक आयुक्त (अन्न), परिमंडळ-२, अहिल्यानगर येथील एस. एच. इंगळे यांच्या पथकाने केली.

सण-उत्सवांच्या काळात अन्नपदार्थांमधील संभाव्य भेसळ, चुकीचे लेबलिंग आणि नियमबाह्य विक्री रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम सुरू केली आहे. नागरिकांना सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत आणि त्यांच्या आरोग्याचे संरक्षण व्हावे, हा या मोहिमेचा उद्देश आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# यंदाची दिवाळी फटाकेमुक्त साजरी करा : मुंबई हायकोर्ट

**● मुंबई । वीरभूमी–**
दिवाळीत राज्यात कानठळ्या बसवणारे फटाके सार्वजनिक ठिकाणी फोडण्यास पूर्णपणे बंदी घालण्याचे आदेश देताना यासंदर्भात व्यापक जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. निला गोखले यांच्या खंडपीठाने हे निर्देश देताना प्रदूषण रोखण्यासाठी सामाजिक मूल्यांची जाणीव ठेवून मराठी कलाकार आणि समाजातील प्रसिद्ध व्यक्तींनी स्वत:हून पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

मराठी कलाकारांना आणि सेलिब्रिटींना एकत्र घेऊन ही जनजागृती मोहीम राबवली जावी मात्र या उपक्रमासाठी कलाकारांवर आणि जाहिरातबाजीवर जनतेचा पैसा खर्च करू नका, अशी सक्त ताकीद राज्य सरकारला दिली. सण आणि उत्सवांच्या काळात होणाऱ्या ध्वनी तसेच हवेच्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने आवाज करणाऱ्या फटाक्यांच्या वापरावर निर्बंध लादले आहेत. या प्रकरणी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती निला गोखले यांच्या खंडपीठा समोर सोमवारी सुनावणी झाली.

यावेळी खंडपिठाने प्रदूषण रोखण्यासाठी सामाजिक मूल्यांची जाणीव ठेवून मराठी कलाकार आणि समाजातील प्रसिद्ध व्यक्तींनी स्वत:हून पुढे येण्याचे आवाहन खंडपिठाने केले. मराठी कलाकारांना आणि सेलिब्रिटींना एकत्र घेऊन ही जनजागृती मोहीम राबवण्यात यावी, असे सांगतानाच या उपक्रमासाठी कलाकारांवर आणि जाहिरातबाजीवर जनतेचा पैसा खर्च करू नका, अशी सक्त ताकीद उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिली.

मुंबई आणि पुण्यातील कलाकार मंडळींना ज्या शहराने इतके काही दिले आहे, त्याची परतफेड करण्याची हीच खरी संधी आहे; त्यामुळे सेलिब्रिटींनी या मोहिमेसाठी विनामूल्य काम करण्यास तयार व्हायला हवे, असे मत खंडपीठाने व्यक्त केले.

दरम्यान राज्य सरकारने टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रांच्या माध्यमातून सुरू केलेल्या जनजागृती मोहिमेची माहिती न्यायालयात सादर केली. यावर न्यायालयाने समाधान व्यक्त केले.

# मल्लिकार्जुन खरगे यांच्या वक्तव्याने राजकारणातील सर्व संकेत मोडीत काढले

## पंतप्रधान मोदींच्या कुटुंबीयांवरील वक्तव्याचा मंत्री विखे यांच्याकडून निषेध

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबीयांच्या संदर्भात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेले विधान हे वैफल्यग्रस्त भावनेतून आले असून, काँग्रेसला सर्वच स्तरांवर येत असलेल्या अपयशाची ही केविलवाणी कबुली असल्याची टीका जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.



माध्यमांशी बोलताना डॉ. विखे पाटील यांनी खरगे यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध केला. ते म्हणाले की, राजकारणामध्ये काही सभ्यता आणि संकेत पाळले जाणे अपेक्षित आहे. मात्र, ज्येष्ठ नेत्याकडून अशा प्रकारचे वक्तव्य केले जाणे दुर्दैवी आहे. राजकीय विरोधाच्या नावाखाली इतक्या खालच्या पातळीवर जाऊन वक्तव्य करणे ही काँग्रेसच्या वैचारिक दिवाळखोरीची परिसीमा असल्याचेही त्यांनी म्हटले.

काँग्रेस पक्षाला सर्वच स्तरांवर अपयश येत असून, देशातील जनतेने वेळोवेळी दिलेला पराभवाचा कौल अद्यापही काँग्रेसला पचविता आलेला नाही, असा दावा विखे पाटील यांनी केला. विविध मुद्द्यांवर आंदोलने करून तसेच वेगवेगळ्या माध्यमांचा आधार घेऊनही काँग्रेसला जनतेचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने वैफल्यातून अशी वादग्रस्त वक्तव्ये केली जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबीयांबद्दल अपमानकारक भाषा देशातील जनता सहन करणार नाही, असा दावा करत राजकारणातील संकेत मोडणाऱ्यांना जनता थारा देणार नाही, असेही डॉ. विखे पाटील यांनी म्हटले.

रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील ऊर्जा प्रकल्पाचा मूळ विषय समजून न घेता त्यावर राजकीय भाष्य करणे योग्य नाही, असे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पासंदर्भातील भूमिका स्पष्टपणे मांडली असल्याचे त्यांनी सांगितले.

कर्जत येथे सुरू होणाऱ्या आधुनिक ऊर्जा प्रकल्पामुळे राज्याच्या वीजविषयक गरजा पूर्ण करण्यास मदत होईल, असा दावा त्यांनी केला. प्रकल्पामुळे स्थानिक पर्यावरणाला धोका निर्माण होणार नसल्याचे सांगताना नियोजित क्षेत्रापेक्षा दुप्पट वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धन केले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील चारा टंचाईच्या उपाययोजनांबाबत माहिती देताना डॉ. विखे पाटील यांनी पशुधनासाठी चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन प्रशासकीय पातळीवर करण्यात आल्याचे सांगितले.

चाऱ्याला जिल्हाबंदी केल्यामुळे काही ठिकाणी अडचणी निर्माण होत असतील, तर छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करून त्यावर तोडगा काढला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कमी पाण्यात आणि कमी जागेत पौष्टिक चारा उपलब्ध करून देणाऱ्या 'हायड्रोपोनिक्स' तंत्रज्ञानाद्वारे चारा निर्मितीला प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. यासाठी जिल्हा नियोजन समिती किंवा टंचाई निधीतून आवश्यक निधी वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

# राहुरीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न दोन दिवसांत मार्गी लावणार; डॉ. सुजय विखे पाटील यांची ग्वाही

**● राहुरी । वीरभूमी–**
नगर-मनमाड महामार्गावरील राहुरी शहर ते नांदगाव शिंगवे दरम्यान गेल्या तीन दिवसांपासून निर्माण झालेल्या भीषण वाहतूक कोंडीची माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. वाहतूक कोंडीची कारणे जाणून घेत त्यांनी प्रशासनाला तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. तसेच येत्या दोन दिवसांत प्रशासन आणि संबंधित ठेकेदारांची बैठक घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



नगर-मनमाड महामार्गावर गेल्या तीन दिवसांपासून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. राहुरी शहर ते नांदगाव शिंगवे तसेच चिंचोली फाटा ते कोल्हार या मार्गावरही वाहतुकीचा खोळंबा होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर महामार्गावरील वाहनांची संख्या वाढली असून, त्यातच वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा मोठ्या प्रमाणात वेळ वाया जात आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहुरी फॅक्टरी येथे थांबून वाहतूक परिस्थितीची पाहणी केली.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच वाहनांची ये-जा सुरळीत राहण्यासाठी आवश्यक ते वाहतूक नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. यावेळी त्यांनी पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्याशी चर्चा करून वाहतूक व्यवस्थापनाबाबत आवश्यक सूचना केल्या.

दरम्यान, सकाळपासूनच डॉ. सुजय विखे पाटील यांचे सहकारी आणि पोलीस प्रशासन वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रयत्नशील होते. वाहनांची वाहतूक सुरळीत व्हावी आणि प्रवाशांना दिलासा मिळावा, यासाठी वाहतूक नियंत्रित करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

मात्र, वारंवार निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची आवश्यकता आहे. यासाठी येत्या दोन दिवसांत प्रशासन आणि संबंधित ठेकेदारांची बैठक घेऊन वाहतूक कोंडीवर प्रभावी उपाययोजना करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून वाहतूक कोंडीने त्रस्त झालेल्या वाहनचालक आणि प्रवाशांचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे लागले आहे.

# 'ऑडिओ क्लिप'प्रकरणी 'एसआयटी' स्थापन

**● मुंबई । वीरभूमी–**
मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहारासंदर्भात प्रसारित केलेल्या ऑडिओ क्लिप प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे. मुंबई पोलिस आयुक्त देवेन भरती यांनी सोमवारी याबाबतचा आदेश जारी केला.

मुंबईच्या दक्षिण प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे हे या पथकाचे प्रमुख आहेत. ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी, अनुषंगिक तांत्रिक तपास आणि प्रकरणाच्या सर्व बाजूंची निष्पक्ष चौकशी करण्याची जबाबदारी या पथकावर सोपविण्यात आली आहे. पथकाच्या सदस्यांमध्ये पोलिस उपायुक्त विजयकांत सागर आणि पोलिस उपायुक्त बजरंग बनसोडे यांचा समावेश आहे. जरांगे-पाटील यांनी २२ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषद घेऊन कथित ऑडिओ क्लिप जारी केली होती. या क्लिपमध्ये शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत जरांगे-पाटील यांना ५०० कोटी रुपये देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

तसेच या क्लिपमध्ये भाजपशी संबंधित काही व्यक्तींच्या नावांचा उल्लेख असल्याचा दावाही विरोधकांकडून करण्यात आला आहे. या क्लिपवरून सत्ताधारी शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये बेबनाव निर्माण झाला आहे. शिवसेना नेते रामदास कदम यांनी पत्रकारपरिषद घेऊन भाजप नेत्यांचा नावानिशी उल्लेख केला होता. भाजपच्या प्रविण दरेकर, प्रसाद लाड या नेत्यांनी रामदास कदमांना प्रत्युत्तरही दिले. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोप-प्रत्यारोप टाळा असा सल्ला आपल्या पक्षातील नेत्यांना दिला. भाजपनेही यावर पडदा टाकला. मात्र भाजपने ही क्लिप शिवसेना ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनीच एआयचा वापर करून केली असा आरोप करत याची चौकशी करण्याची मागणी केली होती.

# मुळा प्रकल्पाच्या पाण्याचे सूक्ष्म नियोजन करा!

## जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश । रब्बी हंगामात उजव्या कालव्यावर एक, तर डाव्या कालव्यावर दोन आवर्तने

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
मुळा प्रकल्पातील उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने आणि कार्यक्षम वापर करण्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे सूक्ष्म नियोजन करावे. पाणी वितरण करताना योग्य नियोजन, वितरणातील कार्यक्षमता आणि पाण्याची बचत यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

मुळा प्रकल्प कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा, पाणीवापराचे नियोजन आणि कालव्यांद्वारे पाणी वितरणासंदर्भातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.



उपलब्ध जलसाठ्याचे महत्त्व लक्षात घेता पाण्याचा योग्य विनियोग होणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. पाणी वितरण प्रक्रियेत समन्वय राखून उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक कार्यक्षम वापर होईल, याची दक्षता घ्यावी, असेही मंत्री डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे आणि कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी सादरीकरणाद्वारे मुळा प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र, लाभक्षेत्रातील पर्जन्यमान, सन २०२६-२७ मधील खरीप हंगामातील पाणीवापर आणि पाण्याच्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

बैठकीला आमदार प्राजक्त तनपुरे, आ. विठ्ठल लंघे, आ. हेमंत ओगले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करून पाणी वितरणाचे नियोजन प्रभावीपणे राबविण्यावर या बैठकीत भर देण्यात आला.

### रब्बी हंगामासाठी दोन कालव्यांचे नियोजन

■ सन २०२६-२७ च्या रब्बी हंगामासाठी शिल्लक पाण्याच्या नियोजनानुसार जानेवारी ते मार्च २०२७ या कालावधीत पुढीलप्रमाणे आवर्तने प्रस्तावित आहेत.

**मुळा उजवा कालवा :** बंधाऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी जानेवारी ते मार्च २०२७ या कालावधीत एक आवर्तन.

**मुळा डावा कालवा :** जानेवारी ते मार्च २०२७ या कालावधीत दोन आवर्तने.

SPOT NEWS



## कुस्ती स्पर्धेत बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या युवराज सातकरची राज्यात बाजी

**● पाथर्डी । वीरभूमी–**

येथील बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी युवराज पंडित सातकर याने राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. ६७ किलो वजनगटात मिळविलेल्या या यशाच्या जोरावर त्याची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने नेवासा येथील घाडगे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, त्रिमूर्तीनगर येथे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत युवराजने आपल्या कौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. युवराजच्या या यशाबद्दल पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, मंडळाचे उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, पर्यवेक्षक सलीम शेख, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले.

## नवरात्रोत्सव, कोजागिरीनिमित्त मिलन ग्रुप व ओमकार लेंडकर मित्र मंडळातर्फे महाप्रसाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेनिमित्त अहिल्यानगर शहरातील बालिकाश्रम रोड येथे मिलन ग्रुप मित्र मंडळ व ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. देवीच्या महाआरतीनंतर परिसरातील भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या उपक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. धार्मिक परंपरेचे जतन करण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि बंधुभावाचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. यावेळी ओम जिंदम, प्रथमेश गुज्जा, दर्शन गालपेली, विशाल अनारसे, शुभम जोग, कुणाल बडगु, कृष्णा मुदिगोंडा, निखिल तौटी, भैय्या गोंधळे, आकाश इमले, ऋषी गालपेली, सजल लोखंडे आणि निशांत यांच्यासह मंडळाचे अन्य सदस्य उपस्थित होते. सदस्यांच्या सहकार्याने महाप्रसादाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## दिवाळीपूर्वी दिव्यांगांचा थकीत भत्ता द्या; अन्यथा मनपाच्या गेटवर आंदोलन!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

दिव्यांगांचा सन २०१८ पासून थकीत असलेला उदरनिर्वाह भत्ता दिवाळीपूर्वी तातडीने द्यावा, या मागणीसाठी प्रहार अपंग क्रांतीच्या वतीने महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. ॲड. लक्ष्मण पोकळे व पोपट शेळके यांनी हे निवेदन सादर केले. महानगरपालिका प्रशासन दिव्यांगांना दरमहा नियमित भत्ता देत नसल्याने त्यांची आर्थिक कुचंबणा होत आहे. यापूर्वी अनेकदा निवेदने देऊनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. दिवाळीचा सण जवळ आल्याने थकीत भत्ता तातडीने वितरित करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. भत्ता वितरित न झाल्यास ३ नोव्हेंबर २०२६ पासून महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर गेट बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा

## केस मागे घेण्यासाठी कोयता-तलवारीचा धाक? बोल्हेगावातील महिलेची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

दाखल केलेली केस मागे घेण्यासाठी कोयता, तलवार व बॅटचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप बोल्हेगाव येथील भारती रविंद्र जाधव यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार अर्ज देऊन संबंधितांवर कारवाई व कुटुंबाला संरक्षण देण्याची मागणी केली आहे. जाधव यांच्या तक्रारीनुसार, २७ ऑगस्ट २०२५ रोजी जालिंदर मुंगसे व सार्थक मुंगसे (दोघे रा. बोल्हेगाव) यांनी त्यांना व त्यांच्या पतीला मारहाण व शिवीगाळ केली होती. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आल्याचे त्यांनी अर्जात म्हटले आहे. दरम्यान, २२ ऑक्टोबर २०२६ रोजी खारे कर्जुने येथे कुटुंबासह गेले असताना, सार्थक मुंगसे व अन्य पाच जणांनी नंबर प्लेट नसलेल्या काळ्या स्विफ्ट कारमधून येत त्यांचे वाहन अडवले. त्यांच्याकडे कोयता, तलवार व बॅटसारख्या वस्तू होत्या. आधीची केस मागे न घेतल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप जाधव यांनी केला आहे. घटनेनंतर कुटुंबीयांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयात अर्ज सादर करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी आणि कुटुंबाला तातडीने संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. तक्रारीसोबत पूर्वीच्या गुन्ह्याच्या एफआयआरची प्रत, मारहाणीचे व्हिडिओ चित्रीकरण आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यातील एनसीची प्रत जोडल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

# भीमाशंकर परिसरातील टोरंट पॉवरचा प्रकल्प रद्द करा!

### पर्यावरणप्रेमींचे तहसीलदारांना निवेदन । निसर्ग, जैवविविधता व वन्यजीवांच्या संरक्षणाची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी –**

भीमाशंकर परिसरातील प्रस्तावित टोरंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत व ऊर्जा साठवणूक प्रकल्पामुळे वनसंपत्ती, जैवविविधता, वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास आणि जलस्रोतांवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करत हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी पाथर्डी तालुक्यातील पर्यावरणप्रेमी व निसर्गप्रेमी नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते उबेद आतार यांच्या वतीने सोमवारी (दि. २६ ऑक्टोबर) पाथर्डीचे तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांना निवेदन देण्यात आले.



भीमाशंकर व सह्याद्रीचा परिसर समृद्ध जैवविविधता, घनदाट वनसंपत्ती, दुर्मिळ व औषधी वनस्पती तसेच विविध वन्यजीवांच्या अधिवासासाठी महत्त्वाचा आहे. या परिसरात प्रस्तावित प्रकल्पासाठी वृक्षतोड, डोंगरांचे उत्खनन आणि मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाल्यास नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास होण्याची शक्यता निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. वन्यजीवांचे अधिवास व भ्रमणमार्ग बाधित होऊन मानव-वन्यजीव संघर्ष वाढण्याचाही धोका असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

तसेच, प्रकल्पामुळे नैसर्गिक ओढे, नद्या, झरे, भूजलसाठे आणि पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर परिणाम होऊ शकतो. डोंगरउतारांचे स्थैर्य धोक्यात येणे, मातीची धूप, गाळ साचणे, ध्वनी व वायुप्रदूषण तसेच भूस्खलनासारख्या समस्या उद्भवण्याची शक्यताही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ आणि आदिवासी समाजाच्या जमिनी, वनहक्क व पारंपरिक उपजीविकेवर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पाला तातडीने स्थगिती देऊन पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास पूर्ण होईपर्यंत वृक्षतोड, उत्खनन व बांधकामास परवानगी देऊ नये, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. वनसंपत्ती, जैवविविधता, वन्यजीवांचे अधिवास, जलस्रोत आणि भूगर्भीय स्थैर्य यांचा स्वतंत्र व निष्पक्ष तज्ज्ञ समितीमार्फत अभ्यास करावा. भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य, पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र आणि वनजमिनीशी प्रकल्पाचा संबंध तपासून संबंधित कायदे व पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी, आदिवासी समाज आणि पर्यावरणप्रेमींच्या सहभागातून पारदर्शक सार्वजनिक सुनावणी घेऊन प्रकल्पासंबंधीचे अहवाल व परवानग्या सार्वजनिक कराव्यात. पिण्याचे पाणी, शेती, वनहक्क आणि स्थानिक नागरिकांच्या उपजीविकेचे संरक्षण करावे. तज्ज्ञांच्या अभ्यासातून पर्यावरणाची गंभीर अथवा अपरिवर्तनीय हानी होण्याची शक्यता स्पष्ट झाल्यास हा प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करावा, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे.

वीज निर्मिती आणि ऊर्जा साठवणूक ही काळाची गरज असली, तरी त्यासाठी जंगल, वन्यजीव, जलस्रोत आणि जैवविविधतेचा नाश होता कामा नये. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होणे भविष्यातील पिढ्यांसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पर्यावरणीय संतुलन राखूनच विकासकामे केली जावीत, अशी भूमिका निवेदनकर्त्यांनी मांडली आहे.

निसर्गाचे संवर्धन आणि पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज असून, शासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन प्रस्तावित प्रकल्पाबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशी कळकळीची विनंती करण्यात आली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने व कायदेशीर चौकटीत जनआंदोलन उभारण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या मागणीस उबेदभाई आतार, अनिल खाटेर, डॉ. दीपक देशमुख, डॉ. अंबिका वाघ, राजेंद्र काळे, डॉ योगीराज देशमुख श्रीकांत काळोखे सर, सुखदेव मर्दाने संदीप राठोड, अभय गांधी, विनायक चौधरी, सुमित तरवडे अविनाश पालवे आदींनी पाठिंबा दिला आहे.

## चोरी-दरोडे रोखण्यासाठी रात्री सतर्क राहा, मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्याचे पारनेर पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**● पारनेर । वीरभूमी–**

तालुक्यात चोरी व दरोड्याच्या संभाव्य घटना रोखण्यासाठी पारनेर पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. रात्रीच्या वेळी जागरूक राहणे, सोने-दागिने व रोख रक्कम सुरक्षित ठेवणे आणि घराबाहेर किंवा गावाबाहेर जाताना शेजारी अथवा पोलिसांना माहिती देणे, अशा महत्त्वाच्या सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.




पारनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सोमनाथ दिवटे यांनी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे आवाहन केले. गावागावांतील नागरिकांपर्यंत सुरक्षेचा संदेश पोहोचवून संभाव्य चोरी व दरोड्यांमुळे होणारे आर्थिक नुकसान टाळणे, हा या सूचनांमागील उद्देश आहे.

चोरी व दरोड्याच्या घटना टाळण्यासाठी नागरिकांनी रात्रीच्या वेळी जागरूक राहावे. घराच्या सुरक्षेसाठी मजबूत लोखंडी सेफ्टी दरवाजा बसवावा. दरवाजांना आवश्यक कड्या आणि सुरक्षित कुलूपव्यवस्था ठेवावी. परिसरात संशयास्पद हालचाल आढळल्यास दुर्लक्ष न करता तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी.

मौल्यवान वस्तू, सोने-दागिने आणि रोख रक्कम घरात असुरक्षित ठिकाणी ठेवू नये, असे पोलिसांनी सूचित केले आहे. कामानिमित्त घराबाहेर जाताना या वस्तू उघड्यावर किंवा सहज नजरेस पडतील अशा ठिकाणी ठेवणे टाळावे. शक्य असल्यास बँकेतील सुरक्षित लॉकरचा वापर करावा. आपल्या घरावर कोणी पाळत ठेवत आहे का, याबाबतही सतर्क राहावे.

काही कारणास्तव घराबाहेर किंवा गावाबाहेर जाताना शेजाऱ्यांना माहिती द्यावी. आवश्यकतेनुसार पारनेर पोलीस ठाण्यालाही कळवावे. अशा वेळी पोलिसांना गस्तीच्या माध्यमातून परिसरातील सुरक्षेसाठी मदत करता येऊ शकते.

नागरिकांनी या सूचनांचे पालन करून स्वतःच्या तसेच परिसराच्या सुरक्षेसाठी सहकार्य करावे. प्रत्येक गावातील नागरिकांपर्यंत हा संदेश पोहोचवून सर्वांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रभारी अधिकारी सोमनाथ दिवटे यांनी केले आहे.

# संतांचे विचार आचरणात आणावेत

### ह. भ. प. डॉ. राजकुमार घुले । कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महिंदा येथे कीर्तन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

मानवता हाच धर्म आहे. जो दुसऱ्या व्यक्तीचे दुःख जाणून घेत नाही, त्याची खरी प्रगती होत नाही. त्यामुळे संतांचे विचार केवळ ऐकण्यापेक्षा ते आचरणात आणणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ह. भ. प. प्रा. डॉ. राजकुमार घुले यांनी केले.



ॐ राम कृष्ण हरी मंत्र मंदिर, श्री क्षेत्र महिंदा येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित कीर्तन सेवेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी संतांच्या विचारांचे महत्त्व स्पष्ट करत उपस्थितांना मानवता, परोपकार, समाधान आणि प्राणीमात्रांवर दया करण्याचा संदेश दिला.

मनुष्य देह पुन्हा पुन्हा मिळणारी गोष्ट नाही. त्यामुळे मिळालेल्या या जन्माचे सार्थक केले पाहिजे. लोभीपणाने वागू नका. अति इच्छेमुळेच अनेक दुःखांची उत्पत्ती होते. त्यामुळे समाधानाने जगायला शिका, असे आवाहन डॉ. घुले यांनी केले.

परोपकार केल्याने पुण्य लाभते, तर परपीडन केल्याने पाप लागते. त्यामुळे प्रत्येकाने परोपकाराची भावना मनात ठेवावी, असा संदेश त्यांनी दिला. तसेच नेहमी मुखी 'राम कृष्ण हरी' नामस्मरण केल्याने मन आणि देह पवित्र होतो, असेही त्यांनी सांगितले.

सर्व प्राणीमात्रांवर दया करा, या संतांच्या विचाराची आजच्या समाजाला अधिक गरज असल्याचे सांगताना डॉ. घुले यांनी सध्या निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुपक्ष्यांसाठी पाण्याची आणि चाऱ्याची व्यवस्था करण्याचे आवाहन केले.

यावेळी संस्थानचे संस्थापक ह. भ. प. प्रा. डॉ. सुभाष शेकडे, सौ. गीताताई शेकडे, ह. भ. प. शिवाजी वारे, प्रा. डॉ. सुमित्रा घुले, बाळासाहेब फुंदे, राजेंद्र बडे, बबनराव टिळेकर, पांडुरंग गोसावी, दिलीप खेडकर, रमेश कांबळे, गोरक्ष दहिफळे, मारुती दहिफळे, प्रल्हाद मगर आदी उपस्थित होते.

महिंदा व विठ्ठलवाडी परिसरातील ग्रामस्थ, महिला मंडळ तसेच भजनी मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवृत्ती दहिफळे यांनी उपस्थित भाविकांसाठी अन्नदानाची व्यवस्था केली.

# विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी एकजूट व्हा; अन्यायाविरोधात आवाज उठवा!

### 'संवाद विद्यार्थ्यांचा, निर्धार न्यायाचा' कार्यक्रमात विवेकानंद पाटील यांचे प्रतिपादन । पोलीस भरतीसाठी मैदान व ग्राउंड ट्रॅक उपलब्ध करून देणार : आ. हेमंत ओगले

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

शिक्षणाचे बाजारीकरण, पेपरफुटी आणि भरती प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मेहनत करूनही संधी मिळत नसेल, तर विद्यार्थ्यांनी अन्यायाविरोधात संघटित होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या हक्कांचा प्रश्न हा केवळ रोजगारापुरता मर्यादित नसून त्यांच्या भविष्याशी निगडित आहे, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते विवेकानंद पाटील यांनी केले. सखी सन्मान फाउंडेशनच्या वतीने आयोजित 'संवाद विद्यार्थ्यांचा, निर्धार न्यायाचा' या कार्यक्रमात ते बोलत होते.

पेपरफुटी, ऑनलाइन परीक्षांमधील कथित गैरप्रकार, पोलीस भरतीतील अनियमितता आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील रिक्त पदांचा प्रश्न यावर विद्यार्थ्यांनी प्रशासनाला जाब विचारला. पोलीस भरतीसाठी मैदान आणि ग्राउंड ट्रॅकची सुविधा, वयोमर्यादेत वाढ तसेच परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता यांसह विविध प्रश्नांवर यावेळी चर्चा झाली.

पोलीस भरतीचे वार्षिक वेळापत्रक जाहीर करावे, वयोमर्यादेत वाढ करावी, परीक्षा पारदर्शक पद्धतीने घ्याव्यात, मुलींसाठी निवासाची व्यवस्था करावी आणि विद्यार्थ्यांना एसटी प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्या विद्यार्थ्यांनी मांडल्या. अभ्यासासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे काही विद्यार्थ्यांना चक्क स्मशानभूमीत बसून अभ्यास करावा लागत असल्याची व्यथाही त्यांनी व्यक्त केली.

भरती प्रक्रियेतील अनिश्चितता आणि कथित गैरप्रकारांमुळे प्रामाणिकपणे तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संधी हिरावल्या जात असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासने देण्याऐवजी ठोस निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

कार्यक्रमाला श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर, तहसीलदार सचिन डोंगरे आणि पोलीस निरीक्षक सुभाष सानप उपस्थित होते.



आमदार हेमंत ओगले यांनी पोलीस भरतीच्या तयारीसाठी मैदान उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांचे प्रश्न हिवाळी अधिवेशनात मांडणार असल्याचे सांगतानाच, महिनाभरात ग्राउंड ट्रॅक तयार करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. त्यामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरावासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

विवेकानंद पाटील यांनी शिक्षणाचे बाजारीकरण आणि राजकीय व्यवस्थेवर टीका करत विद्यार्थ्यांनी अन्यायाविरोधातील लढ्यात एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन केले. उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार शिरसागर यांनी विद्यार्थ्यांना आपला संघर्ष सुरू ठेवण्याचा सल्ला दिला. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी अभ्यासातील सातत्य, शिस्त आणि नियोजनाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना व्यासपीठ मिळाले, त्यांच्या मागण्यांवर चर्चा झाली आणि काही आश्वासनेही देण्यात आली. मात्र, पोलीस भरतीचे वार्षिक वेळापत्रक, वयोमर्यादेतील वाढ, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि सरावासाठी आवश्यक सुविधांबाबत ठोस निर्णय कधी होणार, हा प्रश्न अद्याप कायम आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित या मागण्यांवर प्रशासन पुढे काय भूमिका घेते, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

# रग्बीच्या रणांगणात समताचा डंका!

**● कोपरगाव । वीरभूमी–**

जिद्द, चिकाटी आणि संघभावनेच्या जोरावर समता इंटरनॅशनल स्कूलच्या १७ वर्षांखालील मुलांच्या रग्बी संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणजवळील डेरवण येथील एस.व्ही. जे.सी.टी. स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये झालेल्या या स्पर्धेत समताच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात समताच्या संघाने मुंबईच्या संघाचा १८-० असा एकतर्फी पराभव केला. प्रतिस्पर्ध्याला एकही गुण मिळवू न देता खेळाडूंनी सामन्यावर वर्चस्व गाजवले. त्यानंतर नाशिकच्या संघाला १२-५ असे नमवत समताने अंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या संघाविरुद्ध समताच्या खेळाडूंनी जोरदार लढत दिली. मात्र, विजेतेपदाने हुलकावणी दिल्याने संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. आक्रमक खेळ, चपळाई, भक्कम बचाव आणि उत्कृष्ट सांघिक समन्वयाच्या जोरावर समताच्या खेळाडूंनी राज्यस्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या यशाबद्दल संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडाक्षेत्रातील प्रावीण्यालाही संस्थेत महत्त्व दिले जाते, असे त्यांनी सांगितले.

खेळामुळे शिस्त, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होते. समताच्या खेळाडूंनी दाखवलेली जिद्द आणि संघर्षवृत्ती कौतुकास्पद असून, भविष्यात हे खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही शाळेचा नावलौकिक वाढवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्राचार्य समीर अत्तार यांनीही संघाच्या कामगिरीचे कौतुक केले. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता, नेतृत्वगुण आणि आव्हानांना सामोरे जाण्याची वृत्ती विकसित होते. मैदानावरील अनुभवातून पराभव स्वीकारून त्यातून शिकण्याची आणि नव्या जोमाने पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. समताच्या खेळाडूंनी दाखवलेला सांघिक समन्वय आणि लढाऊ बाणा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. या यशामागे रग्बी प्रशिक्षक सुनील चौधरी यांचे मार्गदर्शन, क्रीडा विभागाचे नियोजन, खेळाडूंचे अथक परिश्रम आणि संस्थेचे सातत्यपूर्ण पाठबळ महत्त्वाचे ठरले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा विभागाचे अभिनंदन करण्यात आले.

### राज्यस्तरीय स्पर्धेत समता इंटरनॅशनल स्कूलच्या १७ वर्षांखालील मुलांच्या संघाला रौप्यपदक



समता इंटरनॅशनल स्कूलच्या संघाने मिळवलेले रौप्यपदक हे मेहनत, शिस्त आणि संघभावनेचे फलित आहे. या यशामुळे शाळेच्या क्रीडा परंपरेला नवी झळाळी मिळाली असून, या युवा खेळाडूंची कामगिरी भविष्यातील मोठ्या यशाची नांदी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## SPOT NEWS




## बनावट सोशल मीडिया खाते उघडणे गंभीर गुन्हा; सागर ढिकले यांचा इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सप व टेलिग्रामवर बनावट खाते उघडून बदनामी करणे, फोटो-व्हिडिओ व्हायरल करणे हा गंभीर सायबर गुन्हा आहे. अशा कृत्यांमुळे शिक्षा व दंडासह करिअरवरही परिणाम होऊ शकतो, असे प्रतिपादन सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले. बालिकाश्रम रस्त्यावरील कमल एज्युकेशन संस्थेच्या पोलीस, सैन्य दल व राज्य सेवा सरळ भरती प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थेचे संचालक हर्षद वारे अध्यक्षस्थानी होते. हरियाली संस्थेचे अध्यक्ष अभय ललवानी, संचालक फुलचंद बारस्कर, पोलीस अंमलदार राघवेंद्र भालसिंग व नीलेश पठारे उपस्थित होते. ढिकले यांनी अनोळखी व्यक्तींच्या गुंतवणुकीच्या आमिषांना बळी न पडणे, बँकविषयक माहिती शेअर न करणे आणि संशयास्पद एपीके फाइल्स व प डाउनलोड करणे टाळण्याचे आवाहन केले. ऑनलाइन कर्ज प्स, बनावट खाती आणि सायबर फसवणुकीपासून सावध राहून सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

## राज चेंबर्समध्ये अतिक्रमणाचा विळखा; गाळेधारक त्रस्त!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील कोठला परिसरातील राज चेंबर्स येथे अधिकृत दुकानासमोर कथित अतिक्रमण झाल्याने व्यवसायावर परिणाम होत असल्याची तक्रार शाह प्लंबिंग अँड हार्डवेअरचे दुकानदार महेमुद खान कादर खान यांनी केली आहे. याप्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने तातडीने पाहणी करून नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. खान यांच्या म्हणण्यानुसार, शेजारील आमीर मोबाईल शॉपसमोरच्या जागेत काँक्रीटचे बांधकाम करण्यात आले असून, दुकानासमोर दुचाकी व इतर वाहने उभी केली जातात. त्यामुळे ग्राहकांना दुकानापर्यंत पोहोचताना अडचणी येत असून व्यवसायावरही परिणाम होत आहे. सार्वजनिक रस्त्यावरील वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित विभागाकडे तीन ते चार वेळा लेखी तक्रारी करूनही कारवाई झाली नसल्याचे खान यांनी म्हटले आहे. संबंधित जागेची पाहणी करून अतिक्रमण आढळल्यास ते हटवावे आणि गाळेधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. आता महानगरपालिका प्रशासन काय कारवाई करते, याकडे परिसरातील दुकानदारांचे लक्ष लागले आहे.

## शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अतिक्रमण, मोजणी आणि सीमांकनाअभावी जिल्ह्यातील अनेक शिवपाणंद शेतरस्ते बंद असून, शेतकऱ्यांना शेतीची मशागत व शेतीमालाची वाहतूक करताना अडचणी येत आहेत. हे रस्ते तातडीने खुले करून प्रलंबित प्रकरणांचा कालमर्यादेत निपटारा करावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. चळवळीचे प्रणेते शरद भाऊसाहेब पवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा देण्यात आला. जिल्ह्यातील बंद व अतिक्रमित शेतरस्त्यांचे सर्वेक्षण करून पात्र प्रकरणांत प्रत्यक्ष रस्ते उपलब्ध करून द्यावेत, तहसील कार्यालयांतील प्रलंबित प्रकरणांची तालुकानिहाय यादी तयार करून निर्णयासाठी कालमर्यादा निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच 'मिशन झिरो पेंडन्सी' अंतर्गत प्रकरणे निकाली काढून अधिकृत अभिलेखांनुसार मोजणी व सीमांकन करावे, कायमस्वरूपी हद्दखुणा बसवाव्यात आणि पात्र रस्त्यांचे शासकीय योजनांमधून सिमेंट काँक्रीटीकरण करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. शेतरस्ता प्रकरणांत 'फर्स्ट इन, फर्स्ट आऊट' पद्धतीचा अवलंब करून विहित मुदतीत कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही चळवळीने केली आहे. मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पवळे यांनी दिला. यावेळी नाथाभाऊ शिंदे, रवींद्र खुडे, बाळासाहेब थोरात, पोपट शेळके, आशिष कासार, सचिन शेळके, विजय शेलार, अंबादास आव्हाड, विठ्ठल निर्मल, अतुल नवले आणि आशाताई वाघ यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणींशी संबंधित असलेल्या शेतरस्त्यांच्या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा.

# पारनेरच्या अमरधाममध्ये दुसऱ्या शवदाहिनीसाठी शेडची प्रतीक्षा!

### नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे अंत्यविधीवेळी नातेवाइकांची गैरसोय । सर्व सुविधायुक्त शेड उभारण्याची मागणी

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहराचा झपाट्याने विस्तार होत असून लोकसंख्येतही वाढ होत आहे. शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी पारनेर-आळकुटी रस्त्यालगत सर्व सुविधायुक्त अमरधाम उभारण्यात आले आहे. मात्र, येथील दुसऱ्या शवदाहिनीवर अद्याप शेड उभारण्यात आलेले नसल्याने अंत्यविधीच्या वेळी मृत व्यक्तींच्या नातेवाइकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात किंवा एकाच वेळी अनेक अंत्यविधी आल्यास ही गैरसोय अधिकच वाढते. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन दुसऱ्या शवदाहिनीसाठी सर्व सुविधायुक्त शेड उभारावे, अशी मागणी होत आहे.



अमरधाममध्ये एका शवदाहिनीसाठी व्यवस्थित शेड उभारण्यात आले आहे. मात्र, शेजारील दुसरी शवदाहिनी उघड्यावर असल्याने उन्हाळ्यात कडक ऊन आणि पावसाळ्यात पावसाचा सामना करत अंत्यविधी करण्याची वेळ येऊ शकते. अखेरचा निरोप देण्यासाठी आलेल्या नातेवाइकांना अशा संवेदनशील प्रसंगी गैरसोय सहन करावी लागणे ही चिंतेची बाब आहे.

गेल्या दोन दिवसांत पारनेर शहरात चार व्यक्तींचे निधन झाले. २४ तारखेला दुपारनंतर एका व्यक्तीवर अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले, तर २५ तारखेला आणखी तीन व्यक्तींचे अंत्यविधी याच ठिकाणी पार पडले. कमी कालावधीत चार अंत्यविधी झाल्याने उपलब्ध असलेल्या दोन शवदाहिन्यांवर ताण निर्माण झाला. पुढील अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करून देताना आधीच्या अंत्यविधीनंतर उरलेली गरम राख गोळा करून जागा मोकळी करावी लागल्याची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे नातेवाइकांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले.

एकाच वेळी दोन अंत्यविधी सुरू असताना पाऊस आल्यास उघड्यावर असलेल्या शवदाहिनीचा वापर करताना नातेवाइकांची मोठी गैरसोय होऊ शकते. अंत्यविधीसारख्या संवेदनशील प्रसंगी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने दुःखात असलेल्या कुटुंबीयांना अतिरिक्त त्रास सहन करावा लागतो.

शवदाहिनी उभारण्याबरोबरच तिच्यासाठी छत, पुरेशी जागा आणि अंत्यविधीसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे. शहराचा वाढता विस्तार आणि नागरिकांची गरज लक्षात घेऊन नगरपंचायत प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुसऱ्या शवदाहिनीसाठी तातडीने शेड उभारून पाऊस आणि उन्हापासून संरक्षण मिळेल, अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नगरसेवकांकडून करण्यात आली आहे. नगरपंचायत प्रशासनाने कोणत्याही मोठ्या गैरसोयीची वाट न पाहता या कामाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकही करत आहेत.

### अंत्यविधीवेळी किमान सुविधांसाठी संघर्ष नको : शेलार

▪ अंत्यविधीसारख्या संवेदनशील प्रसंगी नातेवाइकांना किमान मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागू नये. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने कोणत्याही दुर्घटनेची किंवा मोठ्या गैरसोयीची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी आणि अमरधाममधील दुसऱ्या शवदाहिनीसाठी सर्व सुविधायुक्त शेड उभारावे.

– **भूषण शेलार,** नगरसेवक, पारनेर नगरपंचायत

## पाथर्डीत वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनांवर सलग दुसऱ्या दिवशीही धडक कारवाई; २५ वाहनांवर सुमारे ३३ हजारांचा दंड

### ब्लॅक फिल्म, अवैध प्रवासी वाहतूक, फॅन्सी, विना नंबर प्लेटच्या वाहनांवर पोलिसांचा बडगा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरुद्ध राबविण्यात येत असलेली कारवाई दुसऱ्या दिवशीही पोलिसांनी राबवली. पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांनी आज स्वतः फौजफाट्यासह रस्त्यावर उतरून शहरातील प्रमुख चौकात ही विशेष वाहन तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेत चार चाकी वाहनांच्या काचेवर लावलेली ब्लॅक फिल्म, फॅन्सी नंबर प्लेट, नंबर प्लेट नसलेली वाहने तसेच नव्या नियमानुसार आवश्यक असलेली एचएसआरपी नसलेल्या चारचाकी व दुचाकींवर कारवाई करण्यात आली. तसेच अवैध प्रवासी वाहतूकीवर ही बडगा उगारण्यात आला. दिवसभरात सुमारे २५ वाहनांवर कारवाई करून जवळपास ३२ हजार पाचशे रुपयांचा दंड आकारण्यात आला.



शहरात अनेक वाहनचालकांकडून बेशिस्त पार्किंग, वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष केले जात असल्याच्या व अवैध व्यवसाय व चोरीच्या वाहनाचा गुन्ह्यात वाढता वापर या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ही विशेष तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेत स्वतः पोलिस निरीक्षक नितीन कंडारे यांच्यासह सहायक पोलिस उपनिरीक्षक नितीन दराडे, वाहतूक पोलीस कर्मचारी अल्ताफ शेख आणि शिवाजी नागरे, संजय जाधव, रामदास खैरे, गोकुळ वाघ, श्याम बनकर व होमगार्ड कर्मचारी यांनी शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहनांची तपासणी केली.

आज पुन्हा पोलिसांकडून वाहनांची तपासणी सुरू होताच अनेक वाहनचालकांनी आपल्या वाहनांच्या नंबर प्लेट आणि कागदपत्रांबाबत दक्षता घेण्यास सुरुवात केली. तर काहीनी आपले मार्ग बदलले. या कारवाईत अनेकांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले.

वाहतूक व्यवस्था सुरक्षित आणि शिस्तबद्ध राहावी, यासाठी ही मोहीम नियमितपणे राबविण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक नितीन कंडारे यांनी स्पष्ट केले आहे. वाहन धारकांनी व पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालवण्यास देऊ नये कारण काही दूर्दैवी घटना घडल्यास मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. वाहनधारकांनी आपल्या दुचाकींना नियमानुसार योग्य नंबर प्लेट बसवाव्यात, लागू असलेल्या नियमांनुसार एचएसआरपी नंबर प्लेटचा वापर करावा, वाहन चालविताना वैध वाहनचालक परवाना आणि चार चाकीसाठी आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक वाहनचालकाची जबाबदारी असून, दंडात्मक कारवाई टाळण्यासाठीच नव्हे, तर स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठीही नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहनधारकांनी वाहनांची कागदपत्रे व नंबर प्लेट अद्ययावत ठेवून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## आढळगावच्या सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी जिजाराम डोके तर उपाध्यक्षपदी हरिश्चंद्र गव्हाणे

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

तालुक्यातील आढळगाव येथील ग्रामदैवत सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी जिजाराम डोके, उपाध्यक्षपदी हरिश्चंद्र गव्हाणे, सचिवपदी गणेश गाढवे, तर खजिनदारपदी पांडुरंग बोळगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मंदिरात सोमवारी झालेल्या विश्वस्तांच्या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले.





सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टची निवडणूक जिल्हा धर्मादाय उपआयुक्तांच्या आदेशानुसार घेण्यात आली होती. खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शरद जमदाडे, उत्तमराव राऊत, देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब बोळगे आणि देवराव पाटील यांच्या नेतृत्वाखालील ग्रामदैवत विकास मंडळाने निवडणुकीत एकतर्फी वर्चस्व मिळवत सर्व २५ जागांवर विजय मिळविला होता.

त्यानंतर सोमवारी सिद्धेश्वर मंदिरात विश्वस्त शरद शिंदे यांनी मांडलेल्या सूचनेनुसार पोपटराव जमदाडे यांची बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवड करण्यात आली. विश्वस्तांनी मांडलेल्या ठरावानुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि खजिनदार या पदांवर सर्वसहमतीने निवड करण्यात आली.

नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शरद जमदाडे, देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब बोळगे, उत्तमराव राऊत, आढळगाव सेवा संस्थेचे अध्यक्ष गणेश शिंदे, सिद्धेश्वर सेवा संस्थेचे अध्यक्ष सुनील शिंदे, देवराव पाटील, लक्ष्मण वाकडे, रामभाऊ झेंडे, शिवदास शिंदे, डॉ. अशोक वाकडे, आबा शिंदे, अमर छत्तिसे, गणेश शिंदे, संतोष सोनवणे, सतीश काळे, कैलास गव्हाणे, नामदेव डाळिंबे यांच्यासह उपस्थित विश्वस्तांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# संजीवनी बी. फार्मसी महाविद्यालयाला प्रतिष्ठित एनबीए मानांकन

### पुढील साडेतीन वर्षांसाठी मान्यता । संजीवनीच्या शैक्षणिक गुणवत्तेवर राष्ट्रीय समितीची मोहोर

**● कोपरगाव । वीरभूमी –**

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च (बी. फार्मसी) महाविद्यालयाला नवी दिल्ली येथील नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन (एनबीए) या स्वायत्त संस्थेकडून पुढील साडेतीन वर्षांसाठी प्रतिष्ठित मानांकन बहाल करण्यात आले आहे. या मानांकनामुळे संजीवनीच्या शैक्षणिक गुणवत्तेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे, अशी माहिती संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

अमित कोल्हे यांनी दिलेल्या माहितीनुसार, एनबीए मानांकनासाठी संस्थेने मागील तीन वर्षांतील शैक्षणिक कामगिरीचा सविस्तर अहवाल सादर केला होता. यामध्ये विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्या, उच्चशिक्षित व अनुभवी प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी-शिक्षक प्रमाण, प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा उत्तीर्णतेचा वाढता दर, उच्च शिक्षणासाठी परदेशात तसेच नामांकित संस्थांमध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून नामांकित कंपन्यांमध्ये मिळालेल्या नोकऱ्यांची माहिती समाविष्ट होती.

प्राध्यापकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिसंवादांत सहभाग घेणे, संशोधनपर निबंध सादर करणे, कार्यशाळा आयोजित करणे आणि सल्लागार प्रकल्पांमध्ये केलेले काम यांचाही अहवालात समावेश होता. विद्यार्थ्यांनी क्रीडा व इतर क्षेत्रांत मिळवलेले यश, अत्याधुनिक प्रयोगशाळा, नामांकित कंपन्यांशी केलेले सामंजस्य करार आणि माजी विद्यार्थ्यांनी विविध कंपन्यांमध्ये मिळवलेली उच्च पदे, या बाबींचे पुरावेही सादर करण्यात आले होते.

संस्थेला भारत सरकारच्या विविध संस्थांकडून संशोधनासाठी १ कोटी ४८ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मिळाले असून संस्थेतील कर्मचाऱ्यांनी एकूण ४३ पेटंट मिळवल्याची माहिती प्रसिद्धिपत्रकात देण्यात आली आहे. याशिवाय संस्थेचा स्वायत्त दर्जा, नॅक मानांकन, विविध सरकारी संस्थांकडून मिळालेले पुरस्कार आणि पालकांचा संस्थेवरील विश्वास या बाबींचाही अहवालात उल्लेख करण्यात आला होता.



एनबीएच्या निकषांनुसार राष्ट्रीय समितीने संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांची आणि पुराव्यांची प्रत्यक्ष पडताळणी केली. या भेटीनंतर सुमारे एका महिन्यात संस्थेला पुढील साडेतीन वर्षांसाठी मानांकनपत्र प्राप्त झाल्याचे कोल्हे यांनी सांगितले.

आउटकम बेस्ड एज्युकेशनच्या निकषांनुसार शैक्षणिक संस्थांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन होत असताना ग्रामीण भागातून संजीवनीने सातत्याने गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले आहेत, असे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. संस्थेने २०१३ पासून या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू ठेवल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे आणि संचालिका डॉ. मनालीताई कोल्हे यांनी संस्थेचे हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. आर. एस. शेंडगे, हेड ऑफ इन्स्टिट्यूट सर्व्हिसेस प्रकाश जाधव, डायरेक्टर डॉ. विपुल पटेल, डॉ. आर. सी. सुतार यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याच्या कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड!

### आमदार आशुतोष काळे यांचा निर्णय । कर्मचाऱ्यांना एकरकमी २० टक्के बोनस, साडेपाच कोटींची रक्कम बाजारपेठेत येणार

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना यंदा एकरकमी २० टक्के दिवाळी बोनस देण्याचा निर्णय कारखान्याचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे यांनी जाहीर केला आहे. कारखाना व उद्योग समूहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे. बोनसची रक्कम दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांत जमा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

कारखाना व उद्योग समूहाचे संस्थापक माजी खासदार स्वर्गीय कर्मवीर शंकररावजी काळे यांनी ऊस उत्पादक शेतकरी आणि कर्मचाऱ्यांचे हित जपण्याला नेहमीच प्राधान्य दिले. दरवर्षी कर्मचाऱ्यांना भरघोस दिवाळी बोनस देण्याची त्यांनी सुरू केलेली परंपरा आजही कायम आहे. यंदाही कर्मचाऱ्यांना २० टक्के बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बोनसपोटी जवळपास साडेपाच कोटी रुपये कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून बाजारपेठेत येणार आहेत. त्यामुळे दिवाळीच्या काळात स्थानिक बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत होईल. व्यापारी आणि छोट्या-मोठ्या व्यावसायिकांनाही याचा लाभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्वर्गीय कर्मवीर शंकरराव काळे यांनी घालून दिलेल्या परंपरेनुसार माजी आमदार अशोकराव काळे आणि आमदार आशुतोष काळे यांनीही कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. त्रिपक्षीय समितीच्या करारानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनात करण्यात आलेल्या १० टक्के वाढीच्या फरकाच्या रकमेपैकी ५० टक्के रक्कम ऑगस्ट महिन्यात अदा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

कारखान्याने २०२५-२६ च्या हंगामातील ऊसाला यापूर्वी प्रतिमेट्रिक टन ३,००० रुपये पहिली उचल दिली होती. त्यानंतर जून महिन्यात प्रतिमेट्रिक टन १०० रुपये अतिरिक्त रक्कम देण्यात आली. पुढे ही रक्कम वाढवून कार्यक्षेत्रातील ऊसासाठी प्रतिमेट्रिक टन १५० रुपये आणि प्रोत्साहनपर अनुदान ५० रुपये, असे एकूण २०० रुपये देण्यात आले. कार्यक्षेत्राबाहेरील ऊसासाठी प्रतिमेट्रिक टन १५० रुपये अतिरिक्त रक्कम देण्यात आली. ही ऊसबिलाची रक्कम दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी ऊस उत्पादकांच्या बँक खात्यांत जमा करण्यात आल्याचे कारखान्याकडून सांगण्यात आले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणेच कर्मचाऱ्यांचीही दिवाळी आनंदात जावी, या उद्देशाने २० टक्के बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

बोनस जाहीर केल्याबद्दल कर्मचाऱ्यांच्या वतीने युनियनचे जनरल सेक्रेटरी नितीन गुरसळ



आणि सेक्रेटरी प्रकाश आवारे यांनी आमदार आशुतोष काळे यांचा सत्कार करून आभार मानले.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, डिस्टिलरीचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, डेप्युटी सेक्रेटरी संदीप शिरसाठ आणि चीफ अकाउंटंट वैभव काळे आदी उपस्थित होते.

# वैद्यकीय शिक्षणात तंत्रज्ञानासोबत सेवाभाव जपा!

## पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांचा विद्यार्थ्यांना संदेश । विखे पाटील विद्यापीठाच्या पहिल्या बॅचचा उत्साहात स्वागत समारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठे बदल होत असले, तरी डॉक्टरांनी मानवी मूल्ये, सहानुभूती आणि सेवाभावाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कर्करोगतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांनी केले. वैद्यकशास्त्राचे भविष्य केवळ प्रयोगशाळांमध्ये नव्हे, तर डॉक्टरांच्या विचारांत आणि कृतीत घडते. वैद्यकीय सेवेच्या केंद्रस्थानी सेवाभाव असतो, हे कधीही विसरू नका, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.**

पद्मश्री डॉ. विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएसच्या २३व्या बॅचमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह नव्याने स्थापन झालेल्या लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठाच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी डॉ. नोरी बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मोहन खामगावकर, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर, अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे, वसंतराव कापरे, नंदकुमार झावरे, सुभाष पाटील, उत्तमराव कदम, सुभाषराव भदगले, विनायकराव देशमुख, डॉ. अभिजित दिवटे आणि डॉ. पांडुरंग गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षणातील बदलत्या स्वरूपावर भाष्य करताना डॉ. नोरी म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर बुद्धिमत्ता, नैतिक मूल्ये, सहानुभूती आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करण्याचे आव्हान आहे. संगणकीय तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि मानवाप्रती असलेली करुणा यांचा समन्वय साधणे ही आधुनिक वैद्यकीय सेवेची गरज आहे.

कर्करोग उपचारांमधील बदलांचा अनुभव सांगताना त्यांनी निदान, शस्त्रक्रिया आणि किरणोत्सर्गावर आधारित पारंपरिक उपचारपद्धतींपासून आधुनिक कर्करोगशास्त्राने मोठी प्रगती केल्याचे नमूद केले. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जनुकीय माहितीच्या विश्लेषणाच्या माध्यमातून रुग्णाची जैविक वैशिष्ट्ये, जीवनशैली तसेच सामाजिक-आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन अधिक अचूक व वैयक्तिक उपचार करणे शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

'वैद्यकीय शास्त्रात तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी रुग्णाची जीवनकहाणी विसरू नका,' असे सांगत डॉ. नोरी यांनी विद्यार्थ्यांना मानवी दृष्टिकोन जपण्याचे आवाहन केले. प्रत्येक वैद्यकीय अहवालामागे एक मानवी जीवन आणि त्याच्या कुटुंबाचे भविष्य असते. त्यामुळे भविष्यातील डॉक्टरांनी जीवशास्त्र, माहिती तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी विज्ञानासोबतच मानवी मूल्यांचीही जाण विकसित करावी, असे त्यांनी सांगितले.

उत्कृष्ट वैद्यकीय सेवा केवळ मोठ्या आणि नामांकित रुग्णालयांमध्येच नव्हे, तर जिथे तिची खरी गरज आहे तिथेही दिली पाहिजे. 'प्रार्थना करणाऱ्या ओठांपेक्षा सेवा करणारे हात अधिक पवित्र असतात. प्रत्येक रुग्णाची भेट म्हणजे मानवी रूपातील परमेश्वराची सेवा करण्याची संधी आहे,' या शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना सेवाभावी वृत्तीने कार्य करण्याचा संदेश दिला.

जलसंपदामंत्री तथा डॉ. विखे पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी हा समारंभ ऐतिहासिक असल्याचे सांगितले. राज्यातील पहिल्या खासगी ग्रामीण विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याचा हा क्षण संस्थेसाठी महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. विखे पाटील म्हणाले की, विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयाने २३ वर्षांचा प्रवास पूर्ण केला



असून विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न साकार झाले आहे. महाविद्यालयात प्रवेश घेतलेले विद्यार्थी आता फाउंडेशन परिवाराचा भाग झाले असून, कुटुंबाप्रमाणे त्यांच्या पालकत्वाची जबाबदारी स्वीकारण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अडचणी सोडविण्यासाठी लवकरच हेल्पलाईन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कर्करोगतज्ज्ञ समारंभाला उपस्थित असल्याबद्दल समाधान व्यक्त करत डॉ. विखे पाटील यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. शिर्डीचा आध्यात्मिक संदेश न्यूयॉर्कपर्यंत पोहोचवत त्यांनी तेथे साईमंदिर उभारले. त्यांच्या मार्गदर्शनातून विखे पाटील फाउंडेशन आणि नव्याने स्थापन झालेले विद्यापीठ देशात अग्रस्थानी पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. नोरी यांनी भारताशी असलेले आपले नाते अधोरेखित केले. विविध संस्थांशी जोडलेले असतानाही आपले मन भारताशी घट्ट जोडलेले आहे. विखे पाटील फाउंडेशनच्या कर्करोग रुग्णालयातून जागतिक दर्जाची आरोग्यसेवा देण्यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील राहिलो आहोत, असे त्यांनी सांगितले.

शिर्डीच्या साईबाबांवरील श्रद्धा हा आपला नैतिक दिशादर्शक आणि शक्तीचा स्रोत असल्याचे नमूद करत निःस्वार्थ सेवा, नम्रता आणि सर्व जीवांप्रती प्रेम हीच आपल्या कार्याची प्रेरणा असल्याचे डॉ. नोरी यांनी स्पष्ट केले.

## कोपरगावात आ. विवेक कोल्हे यांच्या संकल्पनेतून ५ नोव्हेंबरला 'लोकसंवाद' उपक्रम

### नागरिकांनी २९ ऑक्टोबरपूर्वी समस्या, तक्रारी व मागण्यांचे अर्ज सादर करण्याचे आवाहन

**● कोपरगाव । वीरभूमी –** तालुक्यातील नागरिकांच्या समस्या, तक्रारी, मागण्या आणि विकासकामांशी संबंधित प्रश्न जाणून घेऊन ते मार्गी लावण्यासाठी आ. विवेक कोल्हे यांच्या संकल्पनेतून 'लोकसंवाद' उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. गुरुवार, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी हा कार्यक्रम होणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना आपल्या समस्या प्रशासनासमोर मांडता येणार असून, संबंधित शासकीय विभागांकडून तक्रारींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणार असल्याची माहिती आ.विवेक कोल्हे यांनी दिली आहे.

या उपक्रमाच्या आयोजनाबाबत आ. विवेक कोल्हे यांनी कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत यांना पत्राद्वारे सूचना दिल्या आहेत. नागरिकांच्या विविध समस्या, शासकीय कार्यालयांतील प्रलंबित प्रकरणे, तक्रारी आणि गावांमधील विकासकामांसंदर्भातील मागण्यांवर संबंधित विभागांनी योग्य कार्यवाही करावी, या उद्देशाने या लोकसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.



कोपरगाव तालुक्यातील ब्राह्मणगाव, करंजी, सुरेगाव, धामोरी, चांदेकसारे, कोळपेवाडी, शिंगणापूर, संवत्सर, वारी आणि पोहेगाव या दहा गणांमधील प्रत्येक गावातील नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या समस्या, तक्रारी आणि मागण्यांचे अर्ज २९ ऑक्टोबर २०२६ पूर्वी सादर करावेत. अर्ज सादर करण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध असून, ऑफलाइन अर्जासाठी संबंधित गणप्रमुखांशी संपर्क साधता येणार आहे.

या लोकसंवाद कार्यक्रमासाठी महसूल, शेती महामंडळ, वन विभाग, जलसंपदा, पंचायत समिती, कृषी, महावितरण, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, पोलीस, परिवहन, नगरपालिका, समाजकल्याण, महिला व बालविकास, पशुसंवर्धन, सहकार आदी विभागांच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाला स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती द्यावी, अशा सूचना आ. विवेक कोल्हे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

नागरिकांचे प्रश्न संबंधित शासकीय यंत्रणांपर्यंत पोहोचविणे, प्रलंबित तक्रारींचा पाठपुरावा करणे, विविध विकासकामांशी संबंधित मागण्यांवर कार्यवाही होण्यासाठी प्रयत्न करणे आणि नागरिकांना त्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाकडून थेट माहिती मिळवून देणे, हा या लोकसंवाद उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.कोपरगाव तालुक्यातील दहा गणांमधील नागरिकांनी आपल्या समस्या, तक्रारी व मागण्यांचे अर्ज २९ ऑक्टोबर २०२६ पूर्वी सादर करून या 'लोकसंवाद' उपक्रमात सहभागी व्हावे आणि आपल्या तक्रारींचे निरसन करून घ्यावे, असे आवाहन आ. विवेक कोल्हे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कराड वस्ती शाळेत माजी विद्यार्थी-पालक मेळावा उत्साहात

**● पाथर्डी । वीरभूमी–** येळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कराड वस्ती येथे माजी विद्यार्थी संघ व पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तालुका शालेय पोषण आहार अधीक्षक रामनाथ कराड यांच्या अध्यक्षतेखाली, तर सरपंच संजय बडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी लोकसहभागातून स्व. शर्माबाई कराड यांच्या स्मरणार्थ 'कुसुमाग्रज वाचनालय' स्थापन करण्यात आले. तसेच शाळेच्या शैक्षणिक विकासासाठी माजी विद्यार्थी संघाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली.



मेळाव्यास माजी उपसरपंच पांडुरंग कराड, केंद्रप्रमुख वाल्मीक बडे, अशोक कराड, शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा पूजा बडे यांच्यासह गावातील मान्यवर, माजी विद्यार्थी, पालक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमात सरपंच संजय बडे यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. शाळा डिजिटल करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असून, त्यासाठी सोळाव्या वित्त आयोगाच्या निधीतून तरतूद करण्याबाबत पुढाकार घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात रामनाथ कराड यांनी अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'मिशन आरंभ', 'मिशन आपुलकी', माजी विद्यार्थी संघ स्थापना आणि शाळांमध्ये वाचनालय सुरू करण्याच्या उपक्रमांची माहिती दिली.

शाळेच्या प्रगतीसाठी शिक्षकांसोबतच माजी विद्यार्थी, पालक, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांचा सहभाग महत्त्वाचा आहे. ज्या शाळेने आपल्याला घडविले, त्या शाळेच्या विकासासाठी प्रत्येक माजी विद्यार्थ्याने योगदान द्यावे. शाळेला आवश्यक भौतिक सुविधा, शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने आणि वाचनालयासाठी आर्थिक मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले.

गटशिक्षण अधिकारी सचिन राख यांनी मुख्याध्यापिका निरुपमा ढोले आणि शिक्षिका श्रुतिका शिवगुंडे यांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी संजय बडे, कृष्णा कराड, बंडू कराड, जालिंदर कराड, अजिनाथ कराड, पांडुरंग कराड, अशोक कराड आणि वाल्मीक कराड यांनी पुढाकार घेत आर्थिक मदत केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका निरुपमा ढोले यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षिका श्रुतिका शिवगुंडे यांनी केले, तर जालिंदर कराड यांनी आभार मानले.

## विस्तारित स्नेहालय विद्यालयाच्या बांधकामाचा शुभारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** शिक्षणाला कौशल्यविकासाची जोड मिळाली, तरच ते जीवनोपयोगी ठरते. स्नेहालय संस्थेने शालेय शिक्षणासोबत विविध रोजगाराभिमुख कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन शैक्षणिक क्षेत्रासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे, असे प्रतिपादन मुंबईतील रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्सचे अध्यक्ष विनोद चौबे यांनी केले.

स्नेहालय संस्थेच्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या विस्तारित बांधकामाचा शुभारंभ रोटरी क्लबच्या सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्स, मुंबई आणि रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे सदस्य उपस्थित होते. या दोन्ही क्लबच्या सहकार्याने स्नेहालयच्या कौशल्यविकास केंद्राला अधिक सक्षम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या योजनेचाही प्रारंभ करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्सच्या सदस्यांनी स्नेहालयच्या विविध सामाजिक आणि पुनर्वसनविषयक प्रकल्पांना भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. यामध्ये स्नेहांकुर दत्तक विधान केंद्र, मानसिक आरोग्यासाठी कार्यरत मानसग्राम, अनाथ तसेच एचआयव्ही/एड्सबाधितांच्या पुनर्वसनासाठीचे संकुल, इंग्रजी माध्यमाचे विद्यालय आणि कौशल्यविकास केंद्राचा समावेश होता. कौशल्यविकास केंद्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या



बेकरीसह विविध उपक्रमांचीही पाहुण्यांनी माहिती घेतली.

स्नेहालयचे मुख्य पालक राजीव गुजर यांनी सांगितले की, वंचित घटकांतील मुलांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळावे, या उद्देशाने १८ वर्षांपूर्वी विद्यालयाची सुरुवात करण्यात आली. शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या ६०० पर्यंत पोहोचली आहे. परिणामी, सध्याच्या वर्गखोल्या अपुऱ्या पडू लागल्या आहेत. ही गरज लक्षात घेऊन विद्यालयाच्या इमारतीचा विस्तार करण्यात येत आहे. या बांधकामासाठी अमेरिकेतील दानशूर शब्बीरभाई बहोरा यांनी सहकार्य केले आहे.

स्नेहालयच्या विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्सतर्फे एक लाख रुपये, तर रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलतर्फे ५० हजार रुपयांचे आर्थिक सहकार्य देण्यात आले. अशा प्रकारे कौशल्यविकास केंद्रासाठी एकूण दीड लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

यावेळी स्नेहालयच्या विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली शुभेच्छापत्रे, साबण आणि बेकरी पदार्थ भेट देऊन उपस्थित मान्यवरांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात रोटरी क्लबचे अध्यक्ष अमर गुरप, नारायण शर्मा आणि सतीश सोनी यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शीतल गुंदेचा यांनी प्रास्ताविक केले, तर कौशल्यविकास केंद्राचे संचालक मिलिंद भद्रे यांनी आभार मानले.

## टाकळी ढोकेश्वरमध्ये दिवसाढवळ्या घरफोडी; ३ लाखांचे दागिने लंपास

**● पारनेर । वीरभूमी–** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील खिलारी वस्तीवर दिवसाढवळ्या घरफोडी करून तीन लाख नऊ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना रविवारी (दि. २५ ऑक्टोबर) दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास घडली. मोटारसायकलवरून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी बंद घराचे कुलूप तोडून ही चोरी केली. घरमालक महिलेने आरडाओरडा करताच त्यांनी मोटारसायकलवरून पळ काढला. याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात तीन अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेतातून घरी पाहताच संशयित दिसले

याबाबत मंगल संतोष गोरडे (वय ४५, रा. खिलारी वस्ती, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. रविवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास त्या आई चंद्रभागा यांच्यासोबत घरासमोरील महामार्गाच्या पलीकडे असलेल्या शेतात कांद्याच्या पिकाची खुरपणी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यांचे पती मजुरीच्या कामासाठी बाहेर गेले होते. त्यामुळे घराचे दोन्ही दरवाजे बंद करून त्यांनी कुलूप लावले होते.

दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास शेतातून घराकडे पाहिले असता, घराजवळ २० ते २५ वर्षे वयोगटातील तीन तरुण दिसले. गोरडे यांनी तत्काळ घराकडे धाव घेत त्यांना थांबण्यास सांगितले. मात्र, तिघांनी मोटारसायकलवरून तेथून पळ काढला.

घरात जाऊन पाहणी केली असता, पश्चिम बाजूच्या खोलीच्या दरवाजाचे कुलूप तोडल्याचे दिसून आले. तसेच कपाट आणि इतर सामानाची उचकापाचक झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरातील सोन्याचे मणी, मंगळसूत्र, सोन्याची बोरमाळ, नेकलेस, दोन तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्या, कानातील सोन्याची वेल, सोन्याचे डोरले आणि सोन्याचे १४ शिपले असे दागिने चोरीला गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या दागिन्यांची एकूण किंमत तीन लाख नऊ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

## कुकडीच्या पाण्याचे रोटेशन जाहीर करा; कांदा उत्पादक शेतकरी संभ्रमात

**● निघोज । वीरभूमी–** पारनेर तालुक्यातील कुकडी डावा कालवा व कुकडी नदीच्या लाभक्षेत्रातील शेतकरी यंदा कोणती पिके घ्यावीत, या संभ्रमात सापडले आहेत. पावसाने पाठ फिरवल्याने बागायती भागालाही दुष्काळाचे चटके बसू लागले आहेत. अशा परिस्थितीत रब्बी हंगामातील पाणी सोडण्याचे वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पाण्याची केवळ दोन रोटेशन सोडण्याचे नियोजन असून, तीदेखील डिसेंबर आणि फेब्रुवारी महिन्यात सोडली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करणे आणि हिरव्या चाऱ्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाने दिल्याची चर्चा असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत. कांदा पिकाला वेळेवर पाणी मिळाले नाही, तर कर्जबाजारी शेतकऱ्यांनी काय करायचे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पारनेर तालुक्यातील सुमारे १७ ते १८ गावांना गेल्या अनेक वर्षांपासून कुकडी डावा कालवा आणि कुकडी नदीच्या पाण्याचा लाभ मिळतो. या भागातील अनेक शेतकरी कांदा हे नगदी पीक घेऊन आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करतात. मात्र, गेल्या तीन-चार वर्षांपासून कांद्याला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. यंदा राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्यावरील निर्बंध अधिक कडक झाले आहेत.

रब्बी हंगामातील पाण्याचे रोटेशन कधी सोडले जाणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. कांदा पिकाला साधारण चार ते साडेचार महिन्यांचा कालावधी लागत असल्याने अनेक शेतकरी एक-दोन एकर क्षेत्र कांदा लागवडीसाठी राखून ठेवतात. त्यानुसार मशागत करून रोपेही तयार केली जातात. यंदाही शेतकऱ्यांनी हरभरा, गहू आणि कांदा या पिकांचे नियोजन केले आहे. मात्र, पाटबंधारे विभागाच्या नारायणगाव कार्यालयाकडून पाणी सोडण्याचे वेळापत्रक अद्याप जाहीर न झाल्याने पुढील नियोजन करणे कठीण झाले आहे.

कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी महागडे बियाणे खरेदी करून रोपे तयार केली आहेत. दिवाळीच्या आसपास कांदा लागवडीला वेग येतो. मात्र, वेळेवर पाणी मिळेल की नाही, याची खात्री नसल्याने बियाणे, रोपे आणि मशागतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. कांदा लागवडीच्या पूर्वतयारीसाठी हेक्टरी सुमारे ५० हजार रुपये खर्च येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

या भागात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दूध उत्पादन मोठ्या प्रमाणावर केले जाते. मात्र, पाण्याची टंचाई वाढल्याने हिरवा चारा घेणेही अवघड झाले आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने शेतीसाठी पाणी मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

येत्या १० नोव्हेंबरपर्यंत पाण्याचे पहिले रोटेशन सोडण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. त्यामुळे शेतीच्या नियोजनानुसार पिकांची लागवड करता येईल. पाटबंधारे विभागाने तातडीने सल्लागार समितीची बैठक आमदार आणि अन्य लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत घेऊन पाणी सोडण्याचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी



**कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी महागडे बियाणे खरेदी करून रोपे तयार केली आहेत. मात्र, पाणी सोडण्याचे वेळापत्रक जाहीर न झाल्याने लागवडीबाबत संभ्रम कायम आहे.**

मागणी लाभक्षेत्रातील शेतकरी करीत आहेत.

पावसाने दडी मारल्याने या भागातील बाजरी, कपाशी आणि सोयाबीन या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानभरपाई मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे संबंधित विभागाकडे सादर केली आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सरसकट शेतकऱ्यांना दहा हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशीही मागणी करण्यात येत आहे.

पाण्याचे वेळापत्रक जाहीर न झाल्यास कांदा लागवडीचे नियोजन कोलमडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासन आणि पाटबंधारे विभागाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### पाणी अर्ज वाढविण्याचे आवाहन

■ पारनेर तालुक्यात जवळपास १७ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येते. मात्र, शेतकरी केवळ साडेतीन ते चार हजार हेक्टर क्षेत्रासाठीच पाणी अर्ज दाखल करीत असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात येते. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अपेक्षित लाभ घेण्यात मर्यादा येत असल्याचे पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यंदा सर्व लाभधारक शेतकऱ्यांनी अधिकाधिक पाणी अर्ज दाखल करून सिंचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी आणि संचालक मंडळाने केले आहे.